PUBLICATION – PUDHARI
DATE – NOVEMBER 13, 2011
PAGE NO – 2 (MY PUNE)

# ‘सीप’च्या ‘पुणे कनेक्ट’ला प्रतिसाद

**पुणे :प्रतिनिधी**

सॉफ्टवेअर एक्स्पोर्टर असोसिएशन ऑफ पुणे (सीप) तर्फे आयोजित ‘पुणे कनेक्ट २०११’ ला चांगला प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमात पुण्यातील स्टार्टअप कंपन्यांना (नव्या छोट्या कंपन्या) आयटी सेक्टरमधील आघाडीच्या कंपन्यांच्या प्रमुखांसमोर बिझनेस आयडिया दाखविण्याची संधी मिळाली.

सीपचे प्रमुख (प्रेसिडेंट) गौरव मेहता म्हणाले की, पुणे कनेक्ट २०११ उपक्रमामध्ये दोन प्रकारच्या कंपन्यांना स्थान दिले होते. कार्यक्रमादरम्यान सीपच्या सदस्यांनी निवडलेल्या चार कंपन्यांना ईटी नाऊ या व्यापारविषयक बातम्यांच्या चॅनेलने स्टार्टअप शूटआऊट या कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळली.

रेलिस्कोअर, ॲडमोड्यूल, इनोव्हिझ टेक आणि ड्राइड क्लाउड या कंपन्यांनी त्यांची उत्पादने आणि बिझनेस प्लॅन सादर केले. ईटी नाऊच्या सुपर एंजल या कार्यक्रमात हे दाखविले जाणार आहे. इनोव्हिझ टेकने पहिला क्रमांक पटकावला. ईटी नाऊच्या सुपर एंजल शोमधील अंतिम स्पर्धकांपैकी एक म्हणून इनोव्हिझ असून, या माध्यमातून निधी उभारण्याची संधी कंपनीस मिळणार आहे. ‘बेस्ट ऑफ कनेक्ट २०११’ म्हणून केपॉइंट, व्हॅल्यूटाइझ, ड्रॉइडक्लाड आणि इनोव्हाइझ टेक यांची निवड झाली. या कंपन्यांना डिसेंबरमध्ये होत असलेल्या ‘झिनोव्हज ॲडव्हांटेज पुणे’ या परिषदेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.